पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर
:: चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र ::
Date31/05/2025
: 07172-264300 : 07172-255800 : 7447744100 (PRO)

# लिफ्ट देऊन प्रवााशाला लुटणाऱ्या जबरी चोरीतील आरोपी अटक

# एकुण १,२८,०००/- रुपयाची मालमत्ता ची जप्त

# पोलीस स्टेशन रामनगर ची कारवाई

दिनांक २९ मे, २०२५ रोजी दुपारी ३:३० वा.सुमारास यातील फिर्यादी गोपेश गोविंद कुंडू रा.नरेंद्रपूर जि.गडचिरोली हा बंगाली कॅम्प चंद्रपूर येथुन चामोर्शी जाण्याकरीता बसची वाट पाहत असतांना होन्डा शाईन मोटार सायकलवरील दोन व्यक्तींनी त्यास कुठे जायचे आहे असे विचारुन त्यास बल्लारशाह पर्यंत सोडतो म्हणुन आपले मोटार सायकलवर बसवुन जुनोना चौक ते जुनोना गांव जाणारे रोडलगत जंगलात नेवुन त्यास मारहाण करुन त्याचे जवळील मोबाईल, सोन्याचे दागीने व रोख रक्कम बळजबरीने हिसकावून चोरुन नेले. यावरुन पो.स्टे. रामनगर येथे अप.क्र. ४२४/२०२५ कलम ३०९ (६), ३ (५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता.

गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेता मा.पोलीस अधीक्षक चंद्रपूर श्री मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक रिना जनबंधु, उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपूर श्री सुधाकर यादव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री आसिफराजा शेख यांचे नेत्त्तात रामनगर पोस्टे गुन्हे शोध पथकाने कौशल्यपूर्ण तपास करुन गुन्हयातील आरोपी नामे (१) स्मित राजेश्वर कोटे वय ३० वर्ष (२) प्रकाश भुरेलाल कबीरदास वय ३१ वर्ष दोन्ही रा. बल्लारशाह यांना ताब्यात घेवुन त्यांच्या कडुन गुन्हयात वापरलेली मोटार सायकल व चोरीचा माल असा एकुण १,२८,०००/- रुपयाची मालमत्ता हस्तगत करण्यात आले.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री आसिफराजा शेख यांचे नेतृत्वात सहा.पोलीस निरीक्षक श्री देवाजी नरोटे, श्री हनुमान उगले, पो.अं. जितेंद्र आकरे, शरद कुडे, आनंद खरात, लालु यादव, प्रशांत शेंदरे, पेतराज सिडाम, सचिन गुरनुले, मनिषा मोरे, रविकुमार ढेंगळे, संदीप कामडी, हिरा गुप्ता, पंकज ठोंबरे, प्रफुल्ल पुप्पलवार, ब्ल्युटी साखरे सर्व पोस्टे रामनगर यांनी केली आहे.